परीक्षा शुल्कमाफीचा तीन लाख विद्यार्थ्यांना लाभ

५१ महाविद्यालयांतील २५ हजार विद्यार्थ्यांना शुल्क परत

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी बसलेल्या २ लाख ९६ हजार ११४ विद्यार्थ्यांना व धाराशिव उपपरिसर येथील प्रथम व द्वितीय वर्षाच्या सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांनाही परीक्षा शुल्कमाफीचा लाभ होणार असल्याचा दावा करण्यात आला आहे. तर शुल्क भरलेल्या ५१ महाविद्यालयांतील २५ हजार ७४ विद्यार्थ्यांचे शुल्क दिवाळी सुटीत कार्यालय सुरू ठेवून परत करण्यात आले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. बी. एन. डोळे यांनी दिली.

विद्यापीठाच्या परीक्षा २७ ऑक्टोबरपासून सुरू झाल्या. या परीक्षांमध्ये बीए, बीएस्सी, बीकॉमसह एकूण १४ पदवी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या संदर्भात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सर्व विद्यापीठांचे कुलगुरू व संविधानिक अधिकारी यांची बैठक घेऊन राज्य शासनाने दुष्काळ जाहीर करून घेतलेल्या परीक्षा शुल्कमाफीचा लाभ देण्याचा आदेश दिला. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील एकही दुष्काळग्रस्त विद्यार्थी शासनाने जाहीर केलेल्या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही सुरू होती. या संदर्भाने कृतिदल स्थापन करण्यात आले होते. दिवाळीपूर्वी व दिवाळीनंतर अशा दोन टप्प्यांत या परीक्षा घेण्यात येत आहेत. सर्व व्यावसायिक व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची परीक्षा २१ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहेत.

दिवाळी सुटीत धनादेश वाटप

दिवाळी सुटीच्या काळात ६ व ७ नोव्हेंबर या दोन दिवशी परीक्षा विभागातील समन्वय विभाग सुरू ठेवण्यात आला. एकूण ५१ महाविद्यालयातील २५ हजार ७४ विद्यार्थ्यांनी १ कोटी ८८ लाख ३३ हजार ७६१ रुपये एवढे परीक्षा शुल्क जमा केले होते. यातील ३४ महाविद्यालयांनी १ कोटी ३६ लाख ४४ हजार ७५६ रुपयांचे धनादेश परत दिवाळी सुट्टीत परत नेले आहेत. संबंधित महाविद्यालयांनी या विद्यार्थ्यांना तात्काळ शुल्क परत करावेत, असे डॉ. डोळे यांनी कळविले आहे. समन्वयक विभागाचे उपकुलसचिव डॉ. विष्णु कऱ्हाळे, राजेंद्र गांगुर्डे, महेंद्र पैठणे, हरिदास खुडे आदी कर्मचारी यासाठी प्रयत्नशील आहेत, अशी माहिती देण्यात आली.

शाखानिहाय लाभार्थी विद्यार्थी

६१,७७१	८९,७९०	१०,८१९
वाणिज्य व व्यवस्थापन	मानव्यविद्या शाखा	आंतरविद्या शाखा

१,३३,७३४ विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

दुष्काळाचा उसाच्या वाढीवरही परिणाम

वजनाबरोबरच उत्पादनातही घट; लागवडीचा खर्चही निघेना

लोकसत्ता वार्ताहर

लातूर : खरीप पिकांपाठोपाठ आता दुष्काळाचा फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही बसत आहे. लातूर जिल्ह्यात सुमारे ५५ हजार हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवड झाली आहे. मात्र, पावसाअभावी उसाची पूर्ण वाढ झाली नाही. परिणामी उसाचे वजन आणि उत्पादन घटले आहे. अनेक भागांत एकरी केवळ १५ ते २० टन उत्पादन होत असल्याने शेतकऱ्यांना लागवडीचा खर्च काढणेही अवघड झाले आहे.

यंदा पावसातील दीर्घ खंड आणि पाणीटंचाईचा परिणाम ऊस पिकावर झाला. पुरेसे पाणी न मिळाल्याने उसाची अपेक्षित वाढ झाली नाही. त्यातच दुष्काळी परिस्थितीमुळे साखर कारखान्यांनी गाळप हंगाम लवकर सुरू केला. उसाची पूर्ण वाढ होण्यापूर्वीच तोडणी होत असल्याने उत्पादनावर परिणाम झाला आहे. नेहमी एकरी ५० टनांपेक्षा अधिक उत्पादन मिळणाऱ्या भागात यंदा १५ ते २० टनांपर्यंत उत्पादन घटल्याचे चित्र आहे.

उत्पादन घटले, खर्च मात्र कायम

ऊस लागवड, मशागत, खते, औषधे, पाणी आणि मजुरीसाठी शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. मात्र, उत्पादनात मोठी घट झाल्याने ऊस कारखान्याला दिल्यानंतर मिळणाऱ्या रकमेतून लागवडीचा खर्च भरून निघणेही कठीण झाले आहे. खरीप हंगामातील पिके हातची गेल्यानंतर आता उसानेही शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडवले आहे.

पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे दर द्या

पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांना जो दर दिला जातो, तोच दर मराठवाड्यातील शेतकऱ्यांनाही मिळावा. ऊस उत्पादकांच्या बाबतीत कायम दुजाभाव केला जातो. यंदा उत्पादन घटल्याने लागवड खर्च वसूल होणेही दुरापास्त झाले आहे. योग्य दर मिळाल्यास शेतकऱ्यांच्या हातात काही रक्कम शिल्लक राहू शकेल. त्यामुळे सरकारने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे यांनी केली.

ऊस उत्पादकांना अनुदान द्या

खरीप हंगामातील पिके हातची गेली असून, उसाची उत्पादनक्षमताही घटली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत करून त्यांना पुन्हा शेती उभी करण्यासाठी प्रोत्साहन देण्याची गरज आहे. त्यामुळे सरकारने तातडीने ऊस अनुदान जाहीर करावे, अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे यांनी केली आहे. एकीकडे खरीप पिकांचे नुकसान, तर दुसरीकडे उसाच्या उत्पादनात घट, अशा दुहेरी संकटात ऊस उत्पादक शेतकरी सापडले आहेत. योग्य दर आणि आर्थिक मदत न मिळाल्यास पुढील हंगामासाठी शेती उभी करायची कशी, असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे.

मराठवाड्यातही ऊस दराचा मुद्दा पेटणार

प्रतिकूल परिस्थितीत उसाला अधिकचा दर मिळावा म्हणून पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आक्रमक झाला आहे. दुसरीकडे हाच मुद्दा घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना, प्रहार संघटना व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन ऊस दर संघर्ष समितीची स्थापना केली आहे. उसाला अधिकचा दर कसा मिळवून देता येईल, याबाबत ही समिती काम करणार आहे. त्याचाच भाग म्हणून सोमवारी (दि. १६) लातूर जिल्ह्यातील एका साखर कारखान्यावर आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

येडशी आग दुर्घटनेप्रकरणी प्रशासनाविरुद्ध संताप

लोकसत्ता वार्ताहर

धाराशिव : तालुक्यातील येडशी येथे सोमवारी पहाटे किराणा दुकानासह राहत्या घराला लागलेल्या भीषण आगीत करंडे कुटुंबातील सहा जणांचा होरपळून मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेवरून प्रशासनाविरुद्ध ग्रामस्थांनी संताप व्यक्त करत दिरंगाई आणि व्यवस्थापनावर बोट ठेवले. दरम्यान, नगरपालिकांकडील अग्निशमन विभागाकडील बंबांबाबतच्या तक्रारी पाहता नवी वाहने देण्याची मागणी खासदार ओम राजेनिंबाळकर यांनी उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

येडशी येथील दुकानाला नरक चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी पहाटे अडीचच्या सुमारास आग लागली. आगीने दुकानातील साहित्य काही क्षणातच कवेत घेतले. करंडे कुटुंबाच्या संपूर्ण इमारतीला आगीने वेढा दिला. यामध्ये घरात झोपलेले करंडे कुटुंबीय अडकून पडले होते. याची माहिती मिळताच गावकऱ्यांनी धाराशिव नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला पाचारण केले. मात्र, आलेल्या वाहनात इंधनच नव्हते. वाहन बंद पडल्यावर गावकऱ्यांनी ते ढकलत नेले आणि स्वतः इंधन भरले. वाहनाची पाण्याची टाकीही अर्धीच होती. त्यामुळे सुरुवातीलाच बराच वेळ वाया गेला.

धक्कादायक बाब म्हणजे आलेले अग्निशमन कर्मचारी प्रशिक्षित नव्हते. त्यांच्या अंगावर ड्रेस कोड नव्हता, तसेच सुरक्षा कवचही दिसत नव्हते. त्यामुळे बचावकार्यात अडथळे निर्माण झाले. दरम्यान कळंब, उमरगा आणि तुळजापूर येथील बंबांनाही पाचारण करण्यात आले. त्यांनाही पोहोचण्यास अर्धा तास लागला. तोपर्यंत संपूर्ण घर आगीच्या ज्वाळांनी धगधगत होते. गजबजलेल्या रस्त्यावर घर असतानाही मदत वेळेत पोहोचली नाही, असा आरोप होत आहे.

धाराशिव नगरपरिषदेचे अग्निशमन दल अतिशय निष्क्रिय आहे. ही यंत्रणा सक्षम असती तर इतके जीव गेले नसते. या प्रकरणी संबंधित मुख्याधिकारी आणि जबाबदार असणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करावा. तसेच सत्ताधाऱ्यांनी मदतीचे आश्वासन न देता पीडित कुटुंबाला ठोस मदत करावी. **-उमेश राजेनिंबाळकर,** जिल्हाध्यक्ष, काँग्रेस

फटाक्यांमुळे शहरात तीस ठिकाणी आग

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : दिवाळीला लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आतषबाजीमुळे शहराच्या विविध भागांत तीस ठिकाणी आग लागल्याची माहिती मिळाली आहे. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन आग विझवली. तीन ठिकाणी कचऱ्याला आग लागली. बीड बायपास रोडवरील आयप्पा मंदिराजवळ गॅरेजला आग लागून चार वाहनांचे नुकसान झाले तर दोन ठिकाणी बंद घरांना आणि झाडांना आग लागल्याच्या घटना घडल्या.

दिवाळी सणामध्ये आतषबाजी मोठ्या प्रमाणावर झाली. करोडो रुपयांच्या फटाक्यांचा धूर निघाला. उंच आकाशात उडणारे रॉकेट, अॅटमबॉम्ब, सेव्हन शॉट, बारा आवाजांचे फटाके, तीस आवाजांचे शॉट या फटाक्यांचा आवाज वाढलेला होता. फटाक्यांमुळे आगीच्या घटना घडण्याची दाट शक्यता लक्षात घेऊन मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त तथा अग्निशमन विभागप्रमुख अंकुश पांढरे यांच्या नेतृत्वाखाली अग्निशमन विभागाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार अग्निशमन विभागप्रमुख अशोक खांडेकर यांनी पदमपुरा, सिडको, चिकलठाणा अग्निशमन दलाच्या पथकाला आगीची माहिती मिळताच घटनास्थळी रवाना केले. त्यामुळे आग विझविण्यास मदत झाली. आगीमुळे होणारे जास्तीचे नुकसान टाळले गेले. सुदैवाने या आगीत कोणतीही जिवितहानी झाली नसल्याचे अग्निशमन दलाने कळविले.

८ नोव्हेंबर रोजी सकाळी सिडको एन-१ मधील सर्विस इंडस्ट्रीयल रवी मसालेजवळील संकेत मोटार गॅरेजमधील भंगाराला आग लागली. हर्सूल टी पॉइंटच्या एचपी पेट्रोलपंपाच्या मागे एमएसईबीच्या मैदानातील गवताला आगली. शहागंज जुने बसस्थानक मोकळ्या मैदानात पाइपला आग, हडको सर्विसरोडच्या बाजूला बंद घरामध्ये आग, नागसेननगर गाडे चौक येथील कचरा, नागेश्वरवाडी झाशीची राणी चौक पोलीस उपअधीक्षक कार्यालयाबाजूला झाडाला आग, मुसा चौक जिन्सी येथील शेडला आग, सिडको एन-६ प्रेरणा शाळेच्या बाजूला गवताला आग, एसबीओ शाळेच्या बाजूला गवताला आग, पिसादेवी रोडवरील गुरांच्या वाड्याला, गजानन महाराज मंदिरामागे घराच्या टेरेसवर आग, चिस्तिया चौक एका पत्र्याच्या दुकानाला आग, सिडको एन-१ प्रोझोन मॉलजवळ गवताला आग, छावणी लष्कर भागात गवताला आग, बिबी का मकबरामागे टी पॉइंटजवळ गवताला आग, नारेगाव चौफुलीच्या मांडवी चौक येथे कुलर कंपनीला आग, ज्योतीनगरातील ज्योती मंदिराजवळ पारिजात अपार्टमेंटजवळील झाडाला आग, मुकुंदवाडी संघर्षनगरातील कोरड्या विहिरीतील कचऱ्याला आग, शहानुरवाडी येथे झाडाला आग, अशा अनेक घटनांमुळे अग्निशामक दलातील कर्मचाऱ्यांची धावपळ झाली.

पाथरीत दोन नगरसेवकांचे राजीनामे

नगराध्यक्षांवर भ्रष्टाचाराचे आरोप; शिवसेना शिंदे गटाला धक्का

लोकसत्ता वार्ताहर

परभणी : पाथरी नगरपरिषदेच्या राजकारणात मोठी घडामोड घडली असून प्रभाग क्रमांक ७ मधील शिवसेना पक्षाच्या दोन्ही नगरसेवकांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. पाथरी नगरपरिषदेवर शिवसेनेच्या शिंदे गटाचे वर्चस्व असून दोन नगरसेवकांच्या राजीनाम्यानंतर आमदार सईद खान यांनी राष्ट्रवादीचे आमदार राजेश विटेकर यांच्यावर राजकीय टीका केली आहे. पाथरी नगरपरिषदेतील घडामोडीत यापुढे शिवसेना व राष्ट्रवादी या मित्रपक्षातच आता संघर्षाची धार तीव्र होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

नगरसेविका आलम तरन्नुम बेगम मुजीब आणि नगरसेवक पठाण हसीब खान तहजीब खान यांनी गुरुवारी (दि. १२) जिल्हाधिकाऱ्यांना स्वतंत्र पत्र देऊन राजीनामा सादर केला. या राजीनामापत्रात नगराध्यक्ष आसेफ खान शेरगुल खान यांच्यावर भ्रष्टाचार व मनमानी कारभाराचे आरोप करण्यात आले आहेत. नळपट्टी, घरपट्टी, आठवडी बाजार, नामांतर व जागा, गाळा भाड्याची वसुली नगरपरिषदेच्या खात्यात चलनाद्वारे जमा न करता कर्मचाऱ्यांकडून रक्कम स्वतःजवळ ठेवून वैयक्तिक कामासाठी खर्च केली जात असल्याचा आरोप आहे. तसेच कारभार मनमानी पद्धतीने चालवला जात असून काही निर्णयांत पारदर्शकता व नियमांचे पालन होत नसल्याची शंका त्यांनी व्यक्त केली आहे. दोन्ही नगरसेवक आमदार राजेश विटेकर यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

या दोन्ही नगरसेवकांचे आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत करत असल्याचे आमदार विटेकर यांनी म्हटले आहे. त्यानंतर शिवसेनेचे स्थानिक नेते आमदार सईद खान यांनी विटेकर यांच्यावर टीका केली आहे. आपणही जशाला तसे उत्तर देऊ असे म्हणत त्यांनी विटेकर यांना आव्हान दिले आहे.

एकूणच या दोन नगरसेवकांच्या राजीनाम्यानंतर भविष्यात पाथरी पालिकेत सत्तांतर होणार असल्याचा दावा केला जात असून या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी व शिवसेना या दोन्ही मित्र पक्षातील आमदारांमध्ये मात्र भविष्यात संघर्ष वाढणार असल्याचे दिसून येत आहे.

गेवराईत दोन गटात सशस्त्र हल्ला; पाच जण गंभीर

लोकसत्ता वार्ताहर

बीड : गेवराई शहरातील कुंभार गल्ली परिसरात मंगळवारी रात्री दोन गटांतील युवकांमध्ये झालेल्या हाणामारीत तलवार हल्लाही करण्यात आला असून, यामध्ये पाच जण गंभीर जखमी झाले. यातील एका जखमीची प्रकृती चिंताजनक आहे. फटाके वाजविण्याच्या क्षुल्लक कारणावरून ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे.

या घटनेमध्ये सार्थक सुनील खडके, ओम गणेश खडके, सुनील सुधाकर खडके, गणेश गोरे, ओम गायकवाड यांना यात गंभीर दुखापत झाली आहे. या प्रकरणी अक्षय राऊत, जनार्धन राऊत, ओम राऊत, राहुल शेलारसह एका महिलेविरुद्ध फटाके फोडण्याच्या कारणावरून मंगळवारी रात्री दोन गटांमध्ये झालेल्या हाणामारी व तलवारहल्ला प्रकरणात पोलिसांनी एका महिलेसह अक्षय राऊत, राहुल शेलार यांना अटक केली. उर्वरीत आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. या प्रकरणी एकूण पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

- बुद्धिराज सुकाळे,
पोलीस निरीक्षक, गेवराई (सर्व रा. कुंभारगल्ली) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हाणामारीच्या प्रकाराची माहिती मिळताच गेवराई पोलीस ठाण्याचे निरीक्षक बुद्धिराज सुकाळे यांनी पथकासह घटनास्थळावर धाव घेतली. या परिसरात तणावपूर्ण शांतता असून, पोलीस बंदोबस्त वाढवलेला होता.

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
Hinduja Housing Finance Limited
कॉर्पोरेट कार्यालय 167-169, 2रा मजला, लिटल माउंट, सैदापेट, चेन्नई – 600015. (तामिळनाडू).
ई-मेल आयडी: auction@hindujahousingfinance.com

ई-लिलाव सह विक्रीसाठी सार्वजनिक सूचना (परिशिष्ट- IV A) (नियम 9(1) आणि 8(6))

हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (HHF), **कॉर्पोरेट कार्यालय : 167-169, दुसरा मजला, लिटल माउंट, सैदापेट, चेन्नई – 600015 (तामिळनाडू) आणि शाखा कार्यालय - पहिला मजला, निर्मल हाइट्स, नंदू स्टॉप, औसा रोड, विश्व सुपर मार्केटसमोर, लातूर – 413512.** यांचेकडे तारण असलेल्या **अचल मालमत्तेची सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२** (यापुढे "अधिनियम") अंतर्गत विक्री. ज्याअर्थी, HHFL च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी पुढील कर्ज खात्यांमध्ये सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत जारी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने पुढील मालमत्तांचा **सांकेतिक ताबा** घेतलेला आहे. ही विक्री **https://www.bankauction.com** या वेबसाईटवर दिलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून करण्यात येईल.

मालमत्तेची तपासणीची तारीख	बयाना रक्कमेची दिनांक	ई-लिलाव दिनांक / वेळ
07.12.2026 5 वाजेपर्यंत. (11.00 तास -14.00 तास)	14.12.2026 सायंकाळी 5 वाजेपर्यंत.	15.12.2026 11:00 तास-13:00 तास

अ. क्र	कर्जदार / सह-कर्जदार / हमीदार / कर्ज खाते क्र.	मागणी सुचनेचा दिनांक व रक्कम	अचल मालमत्तेचे वर्णन / सुरक्षित संपत्ती	ताबा दिनांक	आरक्षित किंमत
1.	1. श्री. शबाज पठाण (कर्जदार), 2. कुमारी सलीमूनबी पठाण (सह-कर्जदार), 3. श्री. रब्बानी पठाण (सह-कर्जदार) MH/LTR/LATR/A00 0000198	15.05.2026 रोजी 07.05.2026 रु. 991598/- बोली वाढीव रक्कम: रु. 10,000/- (रुपये दहा हजार फक्त)	जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा जिल्हा आणि उप जिल्हा गाव लातूर, लातूर (रुरल), उत्तरेकडील भाग प्लॉट नं.100 / बी, लांबी दक्षिण - उत्तर क्षेत्र. 35 फू. रुंदी पुर्व - पश्चिम क्षेत्र. 25 फु, एकुण क्षेत्रफळ (875 चौ.फु)(81.31 चौ.मी) सीटीएस नं. 286, लातूर महानगर हाउस / मालमत्ता नं. आर-5 / 2860 पुर्व, नवीन नं. डी-3 / 4403, हाटे नगर, लातुर, ता. आणि जि. लातुर, महानगरपालिका लातुर, चतुर्सिमा - उत्तर - सरकारी रोड, दक्षिण - श्री गनीभाई शेख यांची मालमत्ता, पुर्व - सरकारी रोड, पश्चिम - श्री वाजिद पठाण यांची मालमत्ता	24.08.2026 सांकेतिक या दिनांकास एकूण थकबाकी रु. 993275/- 12.11.2026 पर्यंत	रु. 3703700/- बयाना रक्कम रु. 370370/-

अधिक तपशील आणि चौकशीसाठी **प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, सचिन भालेकर- 8779984037, गणेश पाटिल 9372403099, रितेश गवई- 9011858221, रुषिकेश उभाळे- 9823244498, राहुल निकुरे - 9405473208. यांचेशी संपर्क साधावा. टीप: अटी व शर्तींबाबत अधिक माहितीसाठी कृपया संकेतस्थळाला भेट द्या: https://www.bankauction.com**

स्थान : लातूर, दिनांक: 13/11/2026 — **प्राधिकृत अधिकारी, हिंदुजा हाउसिंग फायनान्स लि.**

SBI स्टेट बँक ऑफ इंडिया
प्राधिकृत अधिकारीचा तपशील :- मोबा. नं. ९८९२८३४४६०
लँडलाईन नं. (कार्यालय) :- ०२२ - ४१६११४२३ सीओ मोबा. नं. ९८६७९७७६५४
शाखा - स्ट्रेस्ड अॅसेट्स मॅनेजमेंट ब्रँच - II, रहेजा चेंबर्स, तळमजला, विंग - बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०००२१
टेलि क्र. : ०२२-४१६११४२३. ईमेल आयडी : team4.15859@sbi.co.in

परिशिष्ट-IV-ए [रुल ८ (६)च्या तरतुदी पाहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

सूचना याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको व हमीदारांना देण्यात येते की, सुरक्षित धनको म्हणून असलेली, "स्टेट बँक ऑफ इंडिया"कडे याखाली वर्णिलेली स्थावर मालमत्ता गहाण आहे/ ताब्यात आहे, जिचा **प्रत्यक्ष ताबा** "स्टेट बँक ऑफ इंडिया"च्या, सुरक्षित धनको, प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे, सदर मालमत्तेची विक्री **३०.११.२०२६** रोजी "जसे आहे जेथे आहे, "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वावर करण्यात येणार आहे. बँकेच्या देणींच्या वसुलीकरिता ताबा घेतलेल्या मालमत्तेच्या ई-लिलावाचे आयोजन (सरफेसी अॅक्ट, २००२ अंतर्गत) याखालील विनिर्दिष्ट शर्ती व अटींवर आधारित करण्यात येणार आहे.

ऋणकोचे नाव	हमीदारांची नावे	वसुलीकरिता थकित देणी ज्याकरिता मालमत्तांची विक्री करण्यात येत आहे
अभय न्युट्रिशन प्रायव्हेट लिमिटेड - गट नं. ८४, गुंडेवाडी, भोकरदान रोड, जालना - ४३१ २०३.	१. श्री. आशिष ओमप्रकाश मंत्री, २. श्री. अतूल ओमप्रकाश मंत्री, ३. श्री. प्रदीप बाबूलाल तोतला, ४. श्रीमती प्रमिला ओमप्रकाश मंत्री, ५. श्री. ओमप्रकाश आसाराम मंत्री, ६. श्री. दिपेश झुंबेरलालजी पटणी, ७. श्री. कचरूलाल कपूरचंद पटणी, ८. श्री. अंजनेया प्रसाद दोड्डा, ९. मेसर्स वृषभ कॉटन प्रा. लि.	१५.१०.२०१९ रोजी प्रमाणे रु. १२०,५२,६६,७१५.९३ + त्यावरील आत्तापर्यंतचे संविदात्मक दरातील व्याज + खर्च व किंमत (वजा शेख वसुली, जर असल्यास) मागणी सूचना तारीख :- १५.१०.२०१९ :

नामाधिकार विलेख धारकांची नावे	मालमत्तांचे वर्णन	ई-लिलावाची तारीख व वेळ	राखीव किंमत व इरठे तपशील	मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ
१. श्री. आशिष ओमप्रकाश मंत्री	१. ओपन रेसिडेंशियल प्लॉट नं. ३४, सीटीएस नं. १०५८५/१, रेल्वे स्टेशन जवळ, जालना, महाराष्ट्र, एकूण मोजमापाचा एरिआ : ४०६.५९ चौ.मी.	तारीख : ३०.११.२०२६, वेळ : स. ११:०० पासून ते दु.०४:०० पर्यंत प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित विस्तारांसह	राखीव किंमत - १. रु. १,०१,००,०००/- २. रु. ३,३०,००,०००/- ३. रु. ३,२५,००,०००/- ४. रु ७२,००,०००/- मालमत्तेची विक्री त्याखाली केली जाणार नाही	२३.११.२०२६ रोजी स. ११:०० पासून ते दु.०२:०० पर्यंत
२. श्रीमती प्रमिला ओमप्रकाश मंत्री	२. रेसिडेंशियल प्लॉट नं. बी-३ (४५५ चौ.मी.) बी-४२ (२६० चौ.मी.) बी-६५ (२१६ चौ.मी.) बी-७६ (१४४ चौ.मी.) बी-१०१ (२१६ चौ.मी.) बी-११९ (२१६ चौ.मी.) बी-१४० (२१६ चौ.मी.) बी-१६२ (१८० चौ.मी.) बी-१९८ (१५० चौ.मी.) बी-२०३ (१५० चौ.मी.) बी-२२५ (१४३.३१) बी-२६५ (१४८.१७ चौ.मी.), सर्व्हे नं. ५०/२/२ व ५०/२/३, सीटीएस नं. ११४३५, औरंगाबाद - जालना रोड, जालना. एरिआ : २४९४.४८ चौ.मी.			
३. श्री. प्रदीप बाबूलाल तोतला	३. रेसिडेंशियल प्लॉट नं. बी-४ (४५५ चौ.मी.) बी-४१ (२६० चौ.मी.) बी-६६ (२१६ चौ.मी.) बी-७७ (१४४ चौ.मी.), बी-१०२ (२१६ चौ.मी.) बी-१२० (२१६ चौ.मी.) बी-१४१ (२१६ चौ.मी.) बी-१६३ (१८० चौ.मी.) बी-१९९ (१५०चौ.मी.) बी-२०४ (१५० चौ.मी.) बी-२२६ (२२९.५४ चौ.मी.) बी-२६६ (१४४.९७ चौ.मी.), सर्व्हे नं. ५०/२/२ व ५०/२/३, सीटीएस नं. ११४३५, औरंगाबाद - जालना रोड, जालना. एरिआ : २५७९.५१ चौ.मी.		इसारा रक्कम ठेव (इरठे)- राखीव किंमतीचा १०% १. रु. १०,१०,०००/- २. रु. ३३,००,०००/- ३. रु. ३२,५०,०००/- ४. रु. ७,२०,०००/-	
४. श्री. आशिष ओमप्रकाश मंत्री	४. रेसिडेंशियल प्लॉट नं. ३५/१, सीटीएस नं. १०५८५/१, रेल्वे स्टेशन रोड, जालना. एरिआ : २९०.४२ चौ.मी. प्राधिकृत अधिकारींना ज्ञात भारांबाबत कोणतीही माहिती नाही.		बोली वृद्धी रक्कम - १. रु. १,००,०००/- २. रु. १,००,०००/- ३. रु. १,००,०००/- ४. रु. ५०,०००/-	

* **खबरदारी** : नोंद घ्यावी की, या ई-लिलावाचे आयोजन **"जसे आहे जेथे आहे, "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर करण्यात येत आहे.

स्वारस्य असलेले बोलीदार/ खरीददारांनी लिलाव वेळेपूर्वी अगोदरच त्यांच्या ग्लोबल इरठे वॉलेटमध्ये ऑनलाइन प्रणालीद्वारे **https://baanknet.com/eauction-psb/eauction/** या आमचे सेवा पुरवठाकार **BAANKNET** ई-लिलाव वेब पोर्टलमध्ये नोंदणी करून इरठे रकमेचे स्थानांतरण करावयाचे आहे. जर इरठे रक्कम ग्लोबल इरठे वॉलेटमध्ये उपलब्ध नसल्यास सिस्टम बोलीस अनुमती देणार नाही. वॉलेटमधील नोंदणी, केवायसी कागदपत्रांची पडताळणी व इरठेचे स्थानांतरण लिलावापूर्वी वेळेच्या आधीच पूर्ण झाले पाहिजे. स्वारस्य असलेले बोलीदार ई-लिलाव बंद होण्यापूर्वी BAANKNET कडे पूर्व-बोली इरठे जमा करतील. पूर्व-बोली इरठेची क्रेडिट केवळ ई-लिलाव वेबसाइटमध्ये सदर माहितीचे अपडेशन व BAANKNET बँक खात्यात प्रदानाच्या स्वीकृती नंतरच देण्यात येईल.

बँकिंग प्रक्रियेनुसार याकरिता काही वेळ लागेल आणि म्हणून बोलीदारांना, त्यांच्या स्व-हितार्थ, सल्ला देण्यात आला आहे की, त्यांनी पूर्व-बोली इरठे रक्कम शेवटच्या मिनिटांत कोणतीही उद्भवणारी समस्या टाळण्याकरिता आधीच पूर्व-बोली इरठे रक्कम जमा करावी.

तेथे प्राधिकृत अधिकारींना कोणत्याही भाराची माहिती नाही. तथापी, स्वारस्य असलेल्या बोलीदाराने संबंधित कार्यालये/ डिपार्टमेंटकडून मालमत्तेवरील भारासंबंधित यथावकाश व स्वतः चौकशी केली पाहिजे. कोणतेही प्राधिकरण किंवा कोणत्याही व्यक्तीकडील सर्व सांविधिक / बिगर - सांविधिक देणी, कर, दर, मूल्यांकने, आकार, शुल्क, इ. चे प्रदान सोसण्याची केवळ यशस्वी बोलीदाराची एकमेव जबाबदारी आहे.

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, सुरक्षित धनकोच्या वेबसाइट्समध्ये तरतूद केलेली लिंक पाहावी : **www.sbi.co.in** व **https://baanknet.com/eauction-psb/eauction/**

बँक वेबसाइट www.sbi.co.in	ई-ऑक्शन वेबसाइट https://baanknet.com/eauction-psb/eauction/

मालमत्ता आयडी नं.	मालमत्ता ठिकाण	मालमत्तेचा व्हिडिओ/ फोटोज	मालमत्तेचा यूएसपी
SBIN78062039866			
SBIN78062045338			
SBIN78062042712			
SBIN78062021394			

सरफेसी अॅक्ट अंतर्गत १५ दिवसीय सांविधिक विक्री सूचना

ऋणको/ हमीदारांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८ (६) अंतर्गत आवश्यकतेनुसार **दिनांकित ०७.११.२०२६** सूचना देण्यात आली आहे.

स्वाक्षरी/-
विमल एच. वाच्छा
सहाय्यक महाव्यवस्थापक व प्राधिकृत अधिकारी
स्टेट बँक ऑफ इंडिया

दिनांक : १२.११.२०२६
स्थळ : मुंबई

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: ६वा मजला, बी बिल्डिंग, गंगा टुएनो, लोहेगाव, पुणे, महाराष्ट्र ४११०१४.
शाखा कार्यालय युनिट: गृहम हाऊसिंग फायनान्स लि., छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), महाराष्ट्र

ई-लिलाव - विक्री सूचना
सरफेसी कायद्यांतर्गत सुरक्षित स्थावर मालमत्तेची विक्री

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्